## महाजन कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर संपन्न

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ**

येथील महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी चे रा. से. यो. शिबीर नजीकच्या जांब या गावी संपन्न झाले. सात दिवसाच्या या शिबिरामध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये ग्रामस्थांसाठी मोफत दंतचिकित्सा अस्थिविकार तसेच स्त्री रोग तज्ञ डॉक्टरांच्या चमुने तपासणी केली.यामध्ये डॉ. येळके , डॉ पडवळे डॉ भंडारी यांनी योगदान दिले.त्याचप्रमाणे पशुवैद्यकीय चिकित्सकांनी गावातील पशुंची चिकित्सा व औषधे देण्यात आली. स्वयंसेवकांसाठी कायदेविषयक ज्ञान आणि व्यक्तिमत्व विकासावर सुद्धा उत्कृष्ट कार्यशाळा घेण्यात आली.यावेळी ॲड. सायरे व प्रा.निलेश औतकर यांनी मार्गदर्शन केले. शेती व युवा पिढी या विषयावर हरिदासजी होरे, से नि मुख्याध्यापक व पुरुषोत्तम टिचुकले, माजी सरपंच जांब यांनी विद्यार्थ्या सोबत संवाद साधला.समारोपीय सत्रात प्रा.राठोड यांनी शिबिराचे महत्व सांगितले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी जांब गावचे माजी सरपंच पुरुषोत्तम टिचुकले यांनी मोलाचे सहकार्य केले. या प्रसंगी संस्थेचे सचिव सदाशिवराव महाजन,उपाध्यक्षा सुजाता जिद्देवार , प्राचार्य आशिष होरे, कार्यक्रम अधिकारी नरेंद्र पंडित, महिला अधिकारी डॉ स्वाती सरकटे , कार्यालय अधीक्षक गजानन सामुतवार ,प्रा पल्लवी वरकड प्रा.सुहास चौधरी, प्रा नरेंद्र इंगळे प्रा.अजंदर चावला प्रा. प्रियंका नखाते प्रा.साक्षी मिर्झापुरे प्रा.अंजली पाटील प्रा. ओम पाळेकर प्रा.प्रज्वल गोरे , प्रा.नयन खोडे ,प्रा.दिपाली शिंदे, प्रा. सोनल शेलारे, प्रा. अभिरुची शेजुळे प्रा.केतकी खडककार, रवी कोहचाडे , विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

# कीटकनाशकांच्या वाढत्या वापरामुळे शेतक-यांचे आरोग्य धोक्यात : देवानंद पवार

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १४ फेब्रुवारी**

PAN Asia Pacific आणि PAN India यांच्या संयुक्त विद्यमाने डिसेंबर २०२४ मध्ये करण्यात आलेल्या क्षेत्रीय सर्वेक्षणात यवतमाळ जिल्ह्यातील कीटकनाशकांच्या वापराबाबत गंभीर वास्तव समोर आले आहे. एकूण १,४८५ शेतकऱ्यांच्या सहभागातून तयार करण्यात आलेल्या या अहवालात आरोग्य, पर्यावरण आणि सुरक्षिततेसंदर्भात चिंताजनक बाबी नोंदविण्यात आल्या आहेत, अशी माहिती देवानंद पवार यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला देवानंद पवार, डॉ. नरसिम्हा रेड्डी, साहेबराव पवार उपस्थित होते.

सर्वेक्षणानुसार ९७.०९ टक्के शेतकरी कीटकनाशकांचा वापर करतात. त्यापैकी ४७.८४ टक्के शेतकरी गेली दहा वर्षांहून अधिक काळ नियमितपणे कीटकनाशके वापरत आहेत. अभ्यासात ३२ सक्रिय घटकांचा उल्लेख असून त्यापैकी ७२ टक्के घटक 'अत्यंत धोकादायक कीटकनाशके' म्हणून वर्गीकृत आहेत. विशेष म्हणजे Monocrotophos हे अत्यंत घातक मानले जाणारे कीटकनाशक असूनही ५६४ प्रतिसादकर्त्यांनी त्याचा वापर केल्याचे नमूद केले आहे. ३३.०९ टक्के शेतकरी कीटकनाशके घरातच साठवून ठेवतात, ज्यामुळे कुटुंबीय, विशेषतः लहान मुले व पाळीव प्राण्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. जरी ९४.१८ टक्के शेतकरी कीटकनाशके मुलांपासून दूर ठेवतात, तरी ५.८२ टक्के जण ही



मूलभूत सुरक्षितता पाळत नाहीत. वापरलेल्या कंटेनरच्या विल्हेवाटीतही गंभीर त्रुटी आढळल्या आहेत. ६०.३७ टक्के शेतकरी कंटेनर जाळतात, ज्यामुळे वायू प्रदूषण वाढते. ३४.५८ टक्के कंटेनर जमिनीत गाडतात, ज्यामुळे माती व भूजल दूषित होण्याचा धोका असतो. चिंताजनक बाब म्हणजे १२.५६ टक्के शेतकरी कीटकनाशकांचे रिकामे डबे अन्न किंवा पाणी साठवण्यासाठी पुनर्वापर करतात. २८.९५ टक्के (४३०) प्रतिसादकर्त्यांनी उलट्या, मळमळ, डोकेदुखी, डोळ्यांची जळजळ, त्वचेचे विकार, जास्त घाम किंवा लाळ येणे तसेच श्वसनाचे त्रास यांसारख्या तीव्र आरोग्य समस्यांची नोंद केली. तर सुमारे ५ टक्के शेतकऱ्यांनी मधुमेह, उच्च रक्तदाब, विकासात्मक अडचणी, शिकण्यात समस्या तसेच यकृत व मूत्रपिंडाचे आजार यांसारख्या दीर्घकालीन आजारांची तक्रार केली. अस्वस्थता, अनुपलब्धता व खर्चिकपणा यांमुळे अनेक शेतकरी वैयक्तिक संरक्षणात्मक साधने (PPE) नियमितपणे वापरत नाहीत. २१.७६ टक्के शेतकरी कीटकनाशकांची फवारणी काढून टाकण्याच्या प्रक्रियेत थेट गुंतलेले असल्याने त्यांचा संपर्काचा धोका वाढतो.

# जिन क्र. २ मधील १४ गाळे बांधकामात अनियमितता ?

## आठ संचालकांचा पत्रकार परिषदेतून आरोप ! ' अध्यक्षांच्या मनमानीने लाखोंचा नुकसान ' !!

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, उमरखेड, दि. १४ फेब्रुवारी**

सहकार क्षेत्रात नावाजलेल्या सहकार महर्षी स्व. भाऊसाहेब माने शेतकरी सहकारी जिनींग ॲन्ड प्रेसिंग सोसायटी लि. उमरखेड या संस्थेमध्ये सुरू असलेल्या जिन क्र. २ मधील १४ दुकान गाळ्यांच्या बांधकामावरून मोठा वाद निर्माण झाला असून संस्थेचे आठ संचालकांनी अध्यक्ष व व्यवस्थापक यांच्यावर मनमानी कारभार करत संस्थेचे तब्बल ३० ते ४० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याचा गंभीर आरोप दि 13 रोजी येथील जिनिंग अँड प्रेसिंग सोसायटीच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेतून केला आहे. या संदर्भात सहायक निबंधकांकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली असल्याचे सांगितले .



यावेळी संस्थेचे मानद सचिव चितांगराव कदम, सतीश नाईक, डॉ. संजय माने, डॉ. भगवानराव देवसरकर, डॉ. संजय कदम ,अतुल पाटील, कपिल चव्हाण उपस्थित होते

कदम यांनी पुढे बोलतांना सांगितले दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत जिन क्र. २ मधील १४ दुकान गाळ्यांच्या बांधकामाचा विषय चर्चेला आला. संस्थेने नेमलेल्या सल्लागार अभियंता प्रणव कदम यांनी हे काम ८.७५ रुपये प्रति स्क्वेअर फुट अधिक जीएसटी या दरात होऊ शकते, अशी माहिती सभागृहास दिली होती. या कामासाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये सर्वात कमी दर वैभव कोसलगे यांनी १४.२५ रुपये प्रति स्क्वेअर फुट असा दिला होता. बैठकीत सर्व निविदाधारकांना बोलावून निगोशिएशन करून दर कमी करण्याचे ठरले होते. मात्र, संचालकांचा आरोप आहे की अध्यक्षांनी इतर संचालकांना विश्वासात न घेता स्वतःच टेंडर उघडून ठेकेदाराशी केवळ २५ रुपयांची कपात करून काम मंजूर केले. यामुळे अंदाजे २० ते २५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा संचालकांनी केला आहे .

याशिवाय, यावर्षी जिनींग व प्रेसिंग युनिट बंद राहिल्यामुळे संस्थेला १२ ते १५ लाख रुपयांचा फटका बसला. मागील वर्षी हे युनिट सुरू असल्याने १२ लाख १ हजार रुपयांचे उत्पन्न झाले होते. चार कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्यांना ग्रॅच्युइटी व रजा रोखीकरणासाठी १८,९६,८८६ रुपये देण्यात आले, ज्यामुळे संस्थेवर अतिरिक्त आर्थिक ताण पडल्याचे सांगितले . मानद सचिव कदम यांच्या सह संचालकांचा आणखी आरोप आहे की बैठकीत जे ठरले ते नोंदविण्याऐवजी प्रोसीडिंग बुकमध्ये "सर्वानुमते ठराव" असा उल्लेख करण्यात आला, ज्यास त्यांनी स्पष्ट विरोध दर्शविला आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून अध्यक्ष व व्यवस्थापक यांच्यावर योग्य ती कारवाई करावी आणि सुरू असलेले बांधकाम तातडीने थांबवावे, अशी मागणी आयोजित पत्रकार परिषदेतून करण्यात आली अन्यथा संस्थेच्या हितासाठी सभासदांना विश्वासात घेऊन आंदोलन व उपोषणाचा इशाराही यावेळी देण्यात आला . सहकार क्षेत्रात पारदर्शकतेचा अभाव आणि अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उघडकीस आल्याने या प्रकरणाकडे तालुक्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## कर्ज वसुलीसाठी आलेल्या महिलेला मारहाण

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १४ फेब्रुवारी**

कर्जवसुलीसाठी आलेल्या एक महिलेला दोन इसमांनी मारहाण केल्याची घटना सावळी सदोबा येथे १३ फेब्रुवारीला घडली. शेख पप्पू शेख अय्याज (३४) रा. महालक्ष्मी वार्ड आदिलाबाद या आपल्या उसनवारीचे एक हजार रुपये वसूल करण्यासाठी सावळी सदोबा येथे सुरेखा बोटरे या महिलेकडे आल्या होत्या. तिच्या घरी जाऊन तिला आवाज दिला असता संतोष रघुनाथे नेवारे (३८) आणि रघुनाथे नेवारे (५६) दोघेही रा. सावळी सदोबा हे दोघे तेथे आले व त्यांनी आपल्याला मारहाण केली, अशी फिर्याद शेख पप्पू शेख अय्याज यांनी पारवा पोलिसात दाखल केली आहे. त्यावरून पोलिसांनी दोघांवर गुन्हा नोंदविला आहे.

# युवा कीर्तनकार शिवलिला ताई पाटील यांच्या कीर्तनाचा कार्यक्रमाचे आयोजन

## संत रविदास महाराज जयंतीनिमित्त वणी येथे कार्यक्रम

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. १४ फेब्रुवारी**

समतेचे अग्रदूत, थोर समाजसुधारक व मानवतेचा संदेश देणारे संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त वणी येथे १४ व १५ फेब्रुवारी रोजी विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजात समता, बंधुता आणि मानवतेचा विचार रुजविण्याच्या उद्देशाने हा जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे.

राष्ट्रीय चर्मकार महासंघ, वणी, श्री संत रविदास महाराज समाज सुधार मंडळ, वणी तसेच श्री संत रविदास महाराज प्रबोधन केंद्र, वणी यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



जयंतीनिमित्त शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी शिवव्याख्यात्या युवा कीर्तनकार ह.भ.प. शिवलीलाताई पाटील यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता ए. एस. एल. लॉन, एस.पी.एम. शाळेमागे, वणी येथे आयोजित करण्यात आला आहे. या कीर्तनातून संत विचार, सामाजिक जागृती आणि अध्यात्मिक संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

तसेच रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता संत रविदास महाराजांच्या मूर्तीला हार व पुष्प अर्पण करून अभिवादन कार्यक्रम श्री संत रविदास महाराज प्रबोधन केंद्र, वणी येथे संपन्न होणार असून भव्य जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सर्व कार्यक्रमांना समाजबांधव, महिला, युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संत रविदास महाराज जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगर परिषद हद्दीतील दैनिक वसुली अखेर बंद

## पिंटु बांगर यांनी केले होते हल्लाबोल आंदोलन



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. १४ फेब्रुवारी**

यवतमाळ नगर परिषद हद्दीत सुरू करण्यात आलेली दैनिक वसुली अखेर बंद करण्यात आली आहे. नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. या सक्तीच्या वसुलीमुळे व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. विशेष म्हणजे सर्वात पहिले शिवसेनेचे पिंटु बांगर यांनी व्यापा-यांना सोबत घेऊन वसुली विरोधात नगर परिषदेवर हल्लाबोल आंदोलन केले होते. कायम विरोध केल्यामुळे अखेर नवीन कार्यकारिणी येताच त्यांनी दैनिक वसुली बंद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे शहरातील व्यापा-यांनी स्वागत केले आहे.

**एकनाथ शिंदे आणि भावनाताईंचे अभिनंदन**

**मालमत्ता करावरील व्याज माफ करण्यासाठी माजी खासदार भावनाताई गवळी यांनी सरकारकडे पाठपुरावा केला होता. या मागणीच्या अनुषंगाने एकनाथ शिंदे यांनी संपुर्ण राज्यातील नगर परिषद हद्दीमधील मालमत्ता करावरील व्याज माफ करण्यासाठी अभय योजना लागु केली होती. याबाबत पिंटु बांगर यांनी अभिनंदन करण्याबाबत सभागृहाला विनंती केल्यानंतर सर्वांनी टाळ्या वाजवून या दोन्ही नेत्यांचे अभिनंदन केले.**

शहरातील दैनिक वसुलीमुळे व्यापारी तसेच कंत्राटदारामध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झाली होती. नगर परिषद हद्दीतील रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांकडून शुल्क वसूल करण्याचे कंत्राट देण्यात आल्यानंतर संबंधित कंत्राटदार केवळ रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांकडूनच नव्हे, तर दुकानांमधून व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांकडूनही सक्तीने वसुली करीत होता. दहा मीटरच्या आत असलेल्या दुकानाकरिता केवळ ३० रुपये आणि मोठ्या दुकानाकरिता ५० रुपये शुल्क निश्चित केले असतांना १०० ते २०० रुपयांपर्यंत सक्तीची वसुली केली जात होती. दुकानाबाहेर माल ठेवला तरी धमक्या देऊन वसुली करण्यात येत असल्याने संतापलेल्या व्यापा-यांनी पिंटु बांगर यांच्या नेतृत्वात नगर परिषदेवर हल्लाबोल आंदोलन केले होते. याशिवाय नगर परिषदेचे भाजपाचे गटनेते नितीन गीरी यांनी सुध्दा दैनिक वसुलीला विरोध केला. त्यामुळे नगर परिषदेने व्यापा-यांचा विरोध लक्षात घेऊन दैनिक वसुली बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे कर भरणा-या व्यावसाईकांकडून दैनिक वसुली करण्यात येऊ नये, कंत्राटदाराने मनात येईल तशी भरलेली रक्कम सक्तीने व्यावसाईकांकडून वसुल करण्यात येऊ नये, सर्वसमावेशक धोरण ठरविल्याशिवाय वसुली बाबत निर्णय घेऊ नये अशा सुचना पिंटु बांगर यांनी नगर परिषद सर्वसाधारण सभेत दिल्या.

# आर्णी रोड रेल्वे पूलाचे काम वेळेत पुर्ण करा अन्यथा रस्त्यावर उतरणार

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि.१४ फेब्रुवारी**

आर्णी रोड वनवासी परिसरातील उड्डाण पूल व रेल्वे पुलाच्या बांधकामामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत यापूर्वी तालुका कॉंग्रेस कमिटी,यवतमाळ यांच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले होते.त्या निवेदनात पर्यायी रस्ता दुरुस्त करणे, मार्गदर्शक फलक लावणे व सुरक्षिततेची उपाययोजना तातडीने करावी,अन्यथा १६ फेब्रुवारी रोजी आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.



यानंतर याच विषयाच्या संदर्भाने यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगूळकर यांची जिल्हाधिकारी,यवतमाळ यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागाची तातडीने बैठक घेऊन प्रश्न निकाली काढण्यासाठी आणखी वेळ मागितला. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी जनहित लक्षात घेऊन प्रशासनाला मुदत दिली.मात्र,दिलेल्या वेळेत कामाची पूर्तता न झाल्यास रस्त्यावर उतरून नागरिकांना न्याय मिळवून देऊ,असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. यावेळी तालुका कॉंग्रेस कमिटी,यवतमाळ चे अध्यक्ष रमेश भिसणकर,शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.बबलू उर्फ अनिल देशमुख,यवतमाळ जिल्हा युवक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे,यांच्यासह पदाधिकारी,व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महिलांनी माता रमाईचा वारसा पुढे चालवावा : पाईकराव

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. १४ फेब्रुवारी**



त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचा त्याग आणि समर्पित कार्य हेच आमच्या जीवनाचे सोने आहे. हे आजच्या सर्वच रमाईच्या लेकींनी स्मरण करून रमाईच्या विचाराचा वारसा समर्थपणे चालवावा, असे प्रतिपादन के. के. पाईकराव आपले विचार व्यक्त करतांना सांगीतले . ते पुढे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माता रमाईची खंबीर साथ आणि सहकार्य लाभल्यामुळे उपेक्षितांच्या जीवनोत्थानासाठी त्यांनी समाजीक कार्य हाती घेतले तेव्हा माता रमाई हि ख-या अर्थाने बहुजनाची माता झाली त्यामुळे समस्त महीलांनी माता रमाईचा वारसा पुढे चालवावा असे आवाहन त्यांनी व्यासपीठावरुन केले कार्यक्रमाचे आयोजन नालंदा बहुउद्देशीय बुद्ध विहार समिती व रमाई बहुउद्देशीय महिला मंडळ आर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ७ फेब्रुवारी रोजी के. के. पाईकराव यांच्या घरी रमाई जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारत बन्सोड तर प्रमुख पाहुणे म्हणून भोजराज लोखंडे उपस्थित होते

# देऊरवाडी (बुटले) येथे महाशिवरात्रीनिमित्त भव्य शंकरपट यात्रा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, ता. १४ फेब्रुवारी**

महाशिवरात्रीनिमित्त देऊरवाडी (बुटले) येथे भव्य शंकरपट यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी ते शनिवार दि. १४ फेब्रुवारी दरम्यान हा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. परिसरातील भाविक व बैलगाडा शर्यतप्रेमींमध्ये यात्रेबाबत विशेष उत्साह दिसून येत आहे.

यात्रेनिमित्त आयोजित शंकरपट स्पर्धेसाठी सुमारे २ लाख ३५ हजार रुपयांची रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. प्रथम



बक्षीस ५१ हजार रुपये, द्वितीय २१ हजार रुपये, तृतीय ११ हजार रुपये तसेच इतर आकर्षक बक्षिसांचीही घोषणा करण्यात आली आहे.

राज्यातील विविध भागांतील नामांकित शंकरपट स्पर्धक सहभाग नोंदवणार असल्याने स्पर्धा रंगतदार होणार आहे. शुक्रवारी सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या हस्ते यात्रेचे उद्घाटन करण्यात आले. यात्रेदरम्यान धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, महाप्रसाद व विविध पारंपरिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे आयोजन समस्त गावकरी मंडळी, देऊरवाडी (बुटले) यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# जगदंबा अभियांत्रिकीतील प्रा. श्रीकांत काळे यांचे वितरित संगणन वातावरण विषयावरील पेटंट प्रकाशित

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १४ फेब्रुवारी**

यवतमाळ येथील नामांकित जगदंबा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील प्राध्यापक श्रीकांत काळे यांनी "वितरित संगणन वातावरणासाठी सुधारित सुरक्षितता प्रोटोकॉलसह संकेतलेखन व संकेतउलगडण यंत्रणा" या विषयावरील पेटंट प्रकाशित केले आहे. हे संशोधन वितरित संगणन वातावरण अधिक सुरक्षित, जलद व कार्यक्षम करण्यासाठी विकसित करण्यात आले असून संगणकीय सुरक्षितता क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे आहे.

प्रा. काळे यांनी अलीकडे विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग नोंदवून कृत्रिम बुद्धिमत्तेमधील शाश्वत विकास, सुरक्षित मेघ संगणन रचना, वितरित प्रणालींमध्ये साखळी-आधारित तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित संगणकीय सुरक्षा नमुने तसेच हरित संगणन व ऊर्जा कार्यक्षम माहिती केंद्रे या विषयांवर संशोधन सादर केले. तसेच इलेक्ट्रॉनिक्स विभागाशी संबंधित विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे.



या पेटंटमुळे वितरित संगणन प्रणालींमध्ये माहितीची सुरक्षित देवाणघेवाण अधिक मजबूत होणार आहे. शासकीय संस्था, उद्योग क्षेत्र तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध घटकांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि वेगवान संगणकीय उपाय उपलब्ध होतील. माहितीची गोपनीयता व संरक्षण अधिक सक्षम होऊन सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

जगदंबा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे प्राध्यापक नियमितपणे संशोधन कार्यात सक्रिय असून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संशोधनाचा अनुभव देतात. पेटंट, संशोधन निबंध, प्रकल्प मार्गदर्शन आणि उद्योगाभिमुख उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान मिळते. विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेषाची वृत्ती निर्माण होऊन त्यांना उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा तसेच रोजगाराच्या संधींसाठी भक्कम पाया मिळतो.या उल्लेखनीय यशाबद्दल प्रा. काळे यांचे संस्थेचे सचिव डॉ.शीतल वातीले, प्राचार्य डॉ.प्रवीण डाखोळे, उपप्राचार्य डॉ विजय भांबेरे, सर्व विभाग प्रमुख यांनी कौतुक केले. संस्थेच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे संशोधन व नवकल्पना क्षेत्रात सातत्याने प्रगती होत असून विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शैक्षणिक व संशोधन वातावरण उपलब्ध होत आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिष्ठेत आणखी भर पडली आहे.

# ढाणकीत जिओचे नेटवर्क 'जाम'; महागड्या रिचार्जवर ग्राहक त्रस्त!

## दोन दिवसांपासून रेंज गायब; डेटाचे नुकसान भरून मिळणार का? ग्राहकांचा सवाल

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. १४ फेब्रुवारी**

सध्या जिओ कंपनीच्या नेटवर्कचा सर्वत्र मोठा गाजावाजा होत असला तरी, ढाणकी शहरात मात्र ग्राहकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या दोन दिवसांपासून जिओचे नेटवर्क पूर्णपणे कोलमडल्याने ग्राहक संतप्त झाले असून, "महागड्या रिचार्जचा फायदा काय?" असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

ढाणकी परिसरात जिओचे मोठ्या प्रमाणावर ग्राहक आहेत. सुरुवातीला चांगले नेटवर्क मिळत असल्यामुळे अनेक नागरिकांनी जिओला पसंती दिली. मात्र, गेल्या ४८ तासांपासून शहरात जिओची रेंज पूर्णपणे गायब झाली आहे. ज्या ठिकाणी रेंज दिसते, तिथे डेटा चालत नाही आणि कॉलिंगमध्ये वारंवार अडथळे येत आहेत. सध्या मोबाईल रिचार्जचे दर गगनाला भिडले आहेत. शेकडो रुपये खर्च करून ग्राहक डेटा आणि कॉलिंग पॅक विकत घेतात. मात्र, दोन दिवसांपासून सेवा ठप्प असल्याने ग्राहकांचा पैसा वाया जात आहे. "आम्ही पैसे पूर्ण भरतो, मग सेवा का मिळत नाही?" असा प्रश्न संतप्त ग्राहक विचारत आहेत.नेटवर्क नसल्यामुळे ग्राहकांचा दैनंदिन डेटा वापरता आला नाही. यामुळे या दोन दिवसांचे नुकसान भरून काढण्यासाठी कंपनीने ग्राहकांना अतिरिक्त डेटा किंवा व्हॅलिडिटी वाढवून द्यावी, अशी मागणी ढाणकीतील ग्राहकांनी केली आहे.आजकाल अनेक छोटी-मोठी कामे, बँकिंग व्यवहार आणि ऑनलाईन शिक्षण मोबाईल इंटरनेटवर अवलंबून आहे. जिओचे नेटवर्क नसल्याने व्यापा-यांचे ऑनलाईन व्यवहार ठप्प झाले असून सर्वसामान्यांचे संपर्क तुटले आहेत. कंपनीने लवकरात लवकर तांत्रिक बिघाड दुरुस्त करून सेवा पूर्ववत करावी, अन्यथा ग्राहक इतर कंपनीकडे वळतील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

४
युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया जिल्हा
रविवार, १५ फेब्रुवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# शहरातील सिंधी समाजाच्या ५०० हून अधिक घर–दुकानांना मोफत मालकी हक्क मिळणार

## आमदार विनोद अग्रवाल यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे सिंधी समाजाला मोठा दिलासा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** १९४७ मधील फाळणीनंतर भारतात विस्थापित झालेल्या सिंधी समाजाला गत ७५ वर्षांपासून जमीनपट्ट्यांच्या मालकी हक्काची मागणी प्रलंबित होती. मतांसाठी राजकारण करणाऱ्यांनी आश्वासन तर दिले, परंतु प्रत्यक्ष हक्क मिळवून देण्यात ते अपयशी ठरले. मात्र आता गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांनी सिंधी समाजाची व्यथा स्वतः जाणून घेत, गेल्या काही वर्षांपासून समाजाला त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्याचाच परिणाम म्हणून आता सिंधी समाजातील हजारो कुटुंबांना मोफत जमीनपट्ट्यांचा मालकी हक्क मिळणार आहे.

या प्रकरणात आमदार विनोद अग्रवाल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी करून सिंधी समाजाला पट्ट्यांचा हक्क देण्याची विनंती केली होती. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्देशानुसार सिंधी समाजाला जमीनपट्टे देण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यात आली व संबंधित विभागाला आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. अलीकडेच राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार विनोद अग्रवाल यांनी उपस्थित केलेल्या सिंधी समाजाच्या प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करून जमीन वाटपाचा प्रश्न सोडवून मालकी हक्क देण्याचे आदेश दिले आहेत. आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, हजारो सिंधी कुटुंबे जमीनपट्ट्यांच्या हक्कासाठी लढा देत होती. टॅंकपार्क परिसरातील ११० दुकाने तसेच एकूण ५०० दुकान–घरे यांना आता मोफत मालकी हक्क मिळणार आहे, मग ते नझूल जमिनीवर किंवा कोणत्याही शासकीय जमिनीवर अतिक्रमणधारक असो. यासोबतच आमदार अग्रवाल यांनी असेही सांगितले की, गोंदिया शहर व ग्रामीण भागात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या अतिक्रमणधारकांनाही (वनजमीन वगळून) जमीन वाटप करून मालकी हक्क देण्याचे काम सुरू आहे. यासाठीचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात असून लवकरच त्यांनाही त्यांचा हक्क मिळणार आहे.



# कृषी उत्पादनांवरील आयात शुल्क शून्य करण्याचा निर्णय म्हणजे देशातील शेतकऱ्यांच्या पाठीत खंजीर : खा. डॉ. नामदेव किरसान




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सालेकसा :** देशातील शेतकरी आधीच कर्जबाजारीपणा, उत्पादन खर्चात वाढ, हमीभावाची अनिश्चितता आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे अडचणीत असताना केंद्रातील भाजपप्रणीत मोदी सरकारने अमेरिकेतून आयात होणाऱ्या कृषी उत्पादनांवरील आयात शुल्क शून्य टक्के करण्याचा घातक निर्णय घेतला आहे. हा निर्णय म्हणजे देशातील शेतकऱ्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्यासारखा असून, यामुळे भारतीय शेती व्यवस्थेचे कंबरडे मोडण्याचा सरकारचा कट स्पष्टपणे समोर येत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी व्यक्त केली आहे.

तत्कालीन प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या वेळी भारतातील उत्पादनावर ३ टक्के आयात शुल्क अमेरिका आकारत होती. परंतु आता मोदी सरकारने डोनाल्ड ट्रम्पच्या दबवाखाली तेच आयात शुल्क १८ टक्के मान्य केलेले आहे. म्हणजे १५ टक्क्यानी अमेरिकेचा फायदा व भारतीय वस्तू अमेरिकेत महाग होतील त्यामुळे आपल्या वस्तूंची निर्यात कमी होईल व भारतात भाव घसरतील. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना व उत्पादकांना नुकसान होईल. अमेरिकेतून भारतात आयात होणाऱ्या वस्तूंवर व कृषी उत्पादनावर ३९ टक्के आयात शुल्क होते, ते आता ट्रम्प च्या दबावाखाली शून्य असणार आहे. त्यामुळे भारत सरकारचा ३९ टक्क्यानी महसूलाचा नुकसान व शून्य दरात अमेरिकन वस्तू व कृषी उत्पादने भारतात आल्यावर त्यांच्या किंमती फारच कमी असतील त्यामुळे भारतीय उत्पादक आणि शेतकऱ्यांना योग्य भाव मिळणार नाही व त्यांचे अतोनात नुकसान होईल. अमेरिकेसारख्या देशांच्या दबावाखाली झुकून कृषी आयातीवरील शुल्क शून्य करणे म्हणजे देशातील शेतकऱ्यांना परदेशी बाजाराच्या दयेवर सोडण्याचा निर्णय आहे, असा आरोपही त्यांनी केला. या धोरणाचा धोका ओळखून खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी यापूर्वी १ एप्रिल २०२५ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनात संसदेत शासनाला कृषी उत्पादनांवरील आयात शुल्क कमी करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता, संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी दिशाभूल करणारी उत्तरे दिली होती. मात्र आता प्रत्यक्षात परदेशी कृषी उत्पादनांवर कोणतेही आयात शुल्क आकारले जाणार नसल्याचे जाहीर झाल्याने सरकारची फसवी आणि शेतकरीविरोधी भूमिका पूर्णपणे उघड झाली आहे, असे खासदार किरसान यांनी सांगितले. मोदी सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यात अपयशी ठरले असून, हे सरकार शेतकरीविरोधी असल्याचे आता वारंवार सिद्ध होत आहे. त्यामुळे या धोरणाच्या विरोधात देशभरातील शेतकरी, शेतकरी संघटना, युवक व जनतेने एकत्र येऊन तीव्र लढा उभारण्यासाठी एकजूट होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. व सरकारने तात्काळ कृषी उत्पादनांवरील आयात शुल्क शून्य करण्याचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणीही खासदार डॉ. किरसान यांनी केली आहे.

# ना सरपंच ना प्रशासक; १७ फेब्रुवारी रोजी सुनावणी

## तालुक्यातील २८ गट ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्याने कामकाज झाले ठप्प

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोर :** राज्यातील अनेक गट ग्रामपंचायतीचा कार्यकाल संपल्याने गाव गाड्याचा कारभार ठप्प झालेला आहे यावर शासन काय तोडगा काढते याकडे गावकऱ्यांची लक्ष लागलेले आहे

> तालुक्यातील २८ गट ग्रामपंचायतची मुदत संपल्याने शासनाच्या पुढील आदेशापर्यंत ग्रामपंचायतीचा कारभार हे ग्रामविकास अधिकारी पाहतील मात्र ते कोणताही आर्थिक व्यवहार करू शकणार नाही
> **– पल्लवी बाडेकर गटविकास अधिकारी पंचायत समिती अर्जुनी मोर**

अर्जुनी मोर तालुक्यात पाच वर्षाचा कार्यकाळ संपलेल्या एकूण २८ गट ग्रामपंचायत आहे मागील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका पार पडून काही ग्रामपंचायती ११ फेब्रुवारी तर काही ग्रामपंचायती १२ फेब्रुवारी २०२१ रोजी पदभार ग्रहण केला होता त्यामुळे पंचवार्षिक कार्यकाळानुसार १२ फेब्रुवारी २०२६ पूर्वी निवडणुका पार पडून नवीन ग्रामपंचायत पदाधिकारी पदारूढ होणे आवश्यक होते पण निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर न झाल्याने प्रशासक राज येणार अशी शक्यता वर्तवली जात होती अशातच राज्य शासनाने २३ जानेवारी २०२६ रोजी परिपत्रक काढून राज्यातील ग्रामपंचायतीचा कार्यकाळ जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचे निर्देश दिले होते या आदिशा विरोधात काही नागरिकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती या याचिकेची दखल घेत नागपूर खंडपीठाने राज्य सरकारच्या प्रशासक नेमण्याचे आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली आहे तर पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होणार आहे त्यामुळे या सुनावणीकडे जनतेचे लक्ष लागलेली आहे.

# शहरातील अंगणवाड्यांची दयनीय अवस्था

## तात्काळ उपाययोजनांची मागणी; जि.प. अध्यक्षांना निवेदन



**अर्जुनी/मोरगाव :** शहरातील विविध प्रभागांमध्ये कार्यरत असलेल्या अंगणवाडी केंद्रांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. यामुळे अंगणवाडी येणाऱ्या चिमुकल्यांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे. दरम्यान अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांना निवेदन देत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

शहरातील अनेक अंगणवाडी इमारती जरजर अवस्थेत असून त्या लहान बालकांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण करत आहेत. अनेक ठिकाणी विद्युत सुविधा उपलब्ध नाही, स्वच्छ पिण्याचे पाणी नाही, तसेच स्वच्छता व देखभालीसाठी आवश्यक निधीचा अभाव आहे. भिंतींची रंगरंगोटी व परिसराची देखभालही होत नसल्याने बालकांना प्रतिकूल वातावरणात शिक्षण घ्यावे लागत आहे. शासनाकडून 'डिजिटल अंगणवाडी' ही संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला असला तरी प्रत्यक्षात मूलभूत सुविधांचाच अभाव असल्याने आधुनिक शिक्षण देणे अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यासाठी कठीण झाले आहे. यामुळे भविष्यातील पिढीच्या जडणघडणीवर परिणाम होत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर अंगणवाडी इमारतींची तातडीने दुरुस्ती, विद्युत व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, डिजिटल शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री, तसेच रंगरंगोटी व स्वच्छतेसाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच यासंदर्भात जि.प. अध्यक्ष भेंडारकर यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी ममता प्रदीप शहारे, चित्रा अनिल शहारे, नितु विलास नंदेश्वर, रेखा पद्माकर भालेराव, रेखा राजकुमारसिंह गौतम, रमा रेवचंद जांभुळकर, प्रणिता कुंदन गंथडे, इंदिरा तारेश उके आणि सुनीता गिरीश बागडे यासह इतर अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

# श्री पब्लिक स्कूलचे दुहेरी यश




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तिरोडा :** शिक्षण आणि स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रात श्री पब्लिक स्कूल, तिरोराचा दबदबा कायम आहे. नुकतेच शाळेतील इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी दिव्यांशी नागपुरे हिने इंटरनॅशनल ऑलिम्पियाडमध्ये सुवर्ण पदक जिंकून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामध्ये शिक्षिका सुषमा ठाकूर मॅडम यांचे विशेष योगदान लाभले.

विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करण्याच्या उद्देशाने शाळेतर्फे एक विशेष 'झि-ईए फाउंडेशन क्विझ' मालिका चालवली जात आहे. या मोहिमेचे समन्वयक प्रा. हितेशकुमार पटले यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली विद्यार्थी दर आठवड्याला स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करत आहेत.

या आठवड्याच्या निकालात विशेष उत्साह दिसून आला, जिथे शाळेच्या शिक्षिका साधना राहांगडाले मॅडम यांची 'स्टार ऑफ द वीक' म्हणून निवड करण्यात आली. तसेच, विद्यार्थ्यांच्या गटात कांचन मेश्राम हिने आपल्या प्रतिभेची ओळख करून देत सलग तिसऱ्या आठवड्यात 'स्टार ऑफ द वीक' बनून विजयाची हॅट्ट्रिक पूर्ण केली.

या शानदार यशाबद्दल शाळेचे संचालक माननीय श्री. रामकृष्ण शेंडे सर आणि प्राचार्य माननीय श्री. राधाकृष्ण शेंडे सर यांनी सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन केले. त्यांनी या शैक्षणिक उपक्रमाचे आणि सहकारी शिक्षकांच्या कष्टाचे कौतुक करताना म्हटले की, अशा प्रयत्नांमुळेच विद्यार्थी भविष्यात 'प्रशासक' बनण्याचे स्वप्न पूर्ण करू शकतील.

# सहा. महसूल अधिकारी अडकला एसीबीच्या जाळ्यात



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**देवरी :** तहसील कार्यालयातील सहायक महसूल अधिकारी संदेश नैनदास बोरकर (३९) याला दीड हजार रुपयांची लाच घेताना गोंदिया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केली. ही कारवाई १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी तहसील कार्यालय, देवरी येथे करण्यात आली.

सविस्तर असे की, देवरी येथील सर्वे क्रमांक ३०९/१/ब मधील सोसायटीतील ओपन स्पेसवर सार्वजनिक गणेश व साई बहुउद्देशीय संस्थेकडून कथित अवैध बांधकाम करण्यात आले आहे. या बांधकामावर कारवाई व्हावी यासाठी तक्रारदार व इतर नागरिकांनी नगरपंचायत, मंडळ अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. कायदेशीर कारवाई न झाल्याने संबंधितांनी उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका दाखल केली होती. न्यायालयाने नगरपंचायत देवरीच्या मुख्याधिकाऱ्यांना योग्य कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार तक्रारदारांनी उपविभागीय अधिकारी देवरी यांना निवेदन दिले. त्यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांनी तहसीलदारांना चौकशी करून वस्तुनिष्ठ अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. दरम्यान, १२ फेब्रुवारी रोजी तक्रारदार चौकशी अहवालाबाबत विचारणा करण्यासाठी तहसील कार्यालयात गेले असता, सहायक महसूल अधिकारी संदेश बोरकर याने तुमच्या बाजूने अहवाल तयार करून देण्यासाठी दोन हजार रुपये लागतील अशी मागणी केली. १३ फेब्रुवारी रोजी त्याने तक्रारदारास फोन करून पैसे घेऊन येण्यास सांगितले. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने गोंदिया एसीबीकडे तक्रार नोंदवली. पडताळणीनंतर एसीबीने सापळा रचला. तडजोडीअंती आरोपीने १,५०० रुपयांची लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवली व ती स्वीकारताना त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपीकडून १,५०० रुपये लाच रक्कम, सुमारे ५,००० रुपये किमतीचा मोबाईल, गुन्ह्यासंदर्भातील कागदपत्रे तसेच व्हॉट्स ॲपवरील चॅटिंगचे स्क्रीनशॉट जप्त करण्यात आले. अंगझडतीत सापडलेले १,००० रुपये वेगळे असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ते परत करण्यात आले. या प्रकरणी देवरी पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीच्या घरझडतीची प्रक्रिया सुरू आहे. एसीबीच्या या कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

# नव्या अंगणवाडीमुळे बालकांच्या शिक्षण व पोषणाला मिळणार चालणा : रचना गहाणे

## गुढरी येथील अंगणवाडी इमारतीचे लोकार्पण



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोरगाव :** ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडी ही पहिली शाळा आहे. नव्या इमारतीमुळे मुलांच्या शिक्षण, पोषण व आरोग्य विषयक सुविधा अधिक सक्षम होतील. महिलांचे सक्षमीकरण आणि बालविकासासाठी शासन कटिबद्ध असून, भविष्यातही अशा सुविधा अधिक वाढविण्यात येतील, असे मत जि.प. सदस्य रचना गहाणे यांनी व्यक्त केले.

नवेगावबांध जिल्हा परिषद क्षेत्रातील मौजा गुढरी येथे नव्याने बांधण्यात आलेल्या अंगणवाडी इमारतीचे लोकार्पण १३ फेब्रुवारी रोजी जि.प. सदस्या रचनाताई गहाणे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. दरम्यान ते बोलत होते. यावेळी पं.स.सदस्य पुष्पलता दृगकर, सरपंच विवेक डोंगरे, उपसरपंच सुवर्णाताई सरोते, पोलीस पाटील मोनिकाताई दोनोडे, अंगणवाडी पर्यवेक्षिका वर्षाताई पुस्तोडे, ग्रा.पं. सदस्य श्रुतीकाताई बहेकार, किरणताई रामटेके, ग्रा.पं. अधिकारी सुनील सोनवाणे, रतिराम कापगते, चंद्रभान बनसोड, हेमराज फुंडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज रामटेके, आशा सेविका दीपलता फुंडे, सत्यजित रामटेके, ज्योत्सना कोरे, शिल्पाताई बनसोड, दिपेंद्र बोरकर तसेच बोंडगावदेवी सर्कलमधील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन एस. आर. नंदरधने यांनी केले, तर आभार प्रदर्शन मनोज रामटेके यांनी मानले. या लोकार्पण सोहळ्यामुळे गुढरी गावाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाला नवे बळ मिळाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# गंगेश्वर मंदिरात उसळणार भाविकांचा सागर



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** गोंदिया शहरापासून अवघ्या हाकेच्या अंतरावर असलेल्या टेमनी येथे भव्य पुरातन शिव मंदिर आहे. या मंदिरात महाशिवरात्री निम्मित मोठी यात्रा भरीत असते. यावर्षी देखील येथे रविवार ते मंगळवार असे तिन दिवसीय यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. येथील ज्ञान गंगेश्वर शिव मंदिर हे पुरातन कालीन आहे. यावर्षी येथे तीन दिवसीय यात्रे निमित्त भव्य देवी जागरण, महाप्रसाद वितरण तसेच भव्य हवन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच येथे भव्य प्रौढ कबड्डी स्पर्धेचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे. सदर यात्रेचा लाभ परिसरातील भाविकांनी घेण्याचे आवाहन समिती च्या वतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक

## राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तिरोडा :** तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक जिल्हाध्यक्ष रविकांत बोपचे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी सांस्कृतिक भवन सभागृहात उत्साहात संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात आला व त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. त्यांच्या कार्याचा आढावा घेताना उपस्थितांनी त्यांच्या नेतृत्वगुणांची व पक्षनिष्ठेची आठवण काढली.

यावेळी तालुक्यातील संघटनात्मक बांधणी, आगामी निवडणुका, पक्षाचे विविध सेल व आघाड्यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्हाध्यक्षांनी कार्यकर्त्यांना संघटन अधिक बळकट करण्याचे व गावपातळीवर पक्षाची पकड मजबूत करण्याचे आवाहन केले व यासह संघटनेच्या विविध पदांवर पदाधिकारी यांना नियुक्त पत्र देत नियुक्ती केली. जिल्हा महासचिवपदी नासिर घाणीवाला, शहर अध्यक्ष विजय बुद्धे, अध्यक्ष संजय धुर्वे, युवक अध्यक्ष प्रकाश पटले, महेश कुकडे, निरज गजभिये, किशोर कुंभरे, मंदाताई टेंभरे, दिपलताताई ठकरेले, वैशालीताई तुरकर, मेघाताई बिसेन, ओमप्रकाश रहांगडाले, युवराज शहारे, एम डी पटले, खेमराज पटले, सौ. भाग्यश्रीताई केळवतकर, सरपंच रविंद्र भगत, विश्वनाथ बिसेन, संजय रहांगडाले, नरेश जांगडे, बालकदास कुंभरे, मोहपत मानकर, जितेंद्र फरकुंडे, सदाशिव कटरे, मंगेश गेडाम, केतन रामटेके, चरणदास भाजीपाले, राहुल हेडाऊ, विजय लिल्हारे, गोधन बसिने, ओमेश अंबुले, राजेश बोपचे, चेतनदास गोखे, दानवीर नंदेश्वर, मुरलीधर कटरे, विजय रहांगडाले, संदीप बिसेन, मोनिस सतीसेवक, डिलेश बिसेन, संकेत शामकुल, यंद्रराज वासनिक, गुलाब कटरे, सौ. अंजुताई कटरे, सौ. वनिता डोंगरे, कमलेश ठाकरे, संतोष हिंगे, विवेक नागदेवे, राजकुमार ठाकरे, शुभम नखाते, राजेंद्र शेंडे, गुणराज भैरम, आदीसह प्रमुख पदाधिकारी, विविध सेल व आघाडीचे अध्यक्ष, प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोखंडी साहित्याने मारून केले जखमी

**गोंदिया :** रामनगर पोलिस ठाण्यांतर्गत कुडवा येथे लोखंडी साहित्याने मारून जखमी केले. ही घटना १२ फेब्रुवारीची आहे. फिर्यादी हंसराज चिखलोंडे हे मित्रासोहब दुकानात असतांना आरोपी शुभम शामकुवर याने तिथे येवून वाद निर्माण केला तसेच फिर्यादीला लोखंडी साहित्याने मारून जखमी केले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पो.हवा. चंद्रिकापुरे करीत आहेत.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
रविवार दि.१५ फेब्रुवारी २०२६

## ढिवरवाडा शाळेतील विद्यार्थ्यांची जंगल सफारी

**भंडारा :** जिल्हा परिषद उच्च प्राथ शाळा ढिवरवाडा, मोहाडी, भंडारा येथील विद्यार्थी व शिक्षक यांची मारुती चितमपल्ली निसर्ग शाळा या उपक्रम अंतर्गत नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प अंतर्गत कोका अभयारण्य मधील चंद्रपूर गेट मधून जंगल सफारी करण्यात आली.

सर्व प्रथम शाळेत प्रद्युम्न साखरे, शेख सर, देव गभणे, आकाश जाधव, अंकोश बोंद्रे, उच्च श्रेणी मुख्याध्यापक चिंतेश्वर सरोते, पद. शिक्षक विनोद कुंभरे स. शि. यांच्या उपस्थितीत वर्ग ६ ते ७ मधील विद्यार्थ्यांना या उपक्रम विषयी माहिती सांगण्यात आली. त्यानंतर वनविभाग तर्फे आलेल्या गाडीत विद्यार्थी व शिक्षक जंगल सफारी करिता सर्व प्रथम चंद्रपूर गेट मधील उप वन संरक्षक यांची भेट घेऊन त्यांनी या जंगल सफारी साठी शुभेच्छा दिले. नंतर पाझर तलाव, कोदुर्ली पहाड, हमेशा अजनी तलाव, प्राण्याच्या पायाचे ठसे यासंबंधी माहिती सांगण्यात आली, नंतर मुख्य प्रवेश द्वार रानगवा प्रवेश द्वार मध्ये सफारी करण्यात आली. या सफारी दरम्यान अभयारण्यात मोर, हरिण, रान कोंबडे, विविध प्रकारचे पक्षी दिसून आलेत.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# ‘त्या’ व्हायरल व्हिडीओतुन रेती घोटाळ्याचा पर्दाफाश?

**■ शासनाला लाखो रूपयाचा महसूली फटका? ■ शासकीय नियमांची ‘ऐैशी कि तैशी’ ■ संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद**


संग्रहित-छाया

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** जिल्ह्यातील पवनी तहसील परिसरातील एका रेती घाटावर रॉयल्टी वसुलीत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विधिवत लिलाव प्रक्रियेनंतरही प्रत्यक्षात दुहेरी दराने रक्कम वसूल केली जात असून शासनाच्या महसुलाला दररोज लाखोंचा आणि वर्षाला कोट्यवधी रुपयांचा फटका बसत असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

विशेष म्हणजे याच रेती व्यवहारामुळे एक उपविभागीय अधिकारी व एक सेवानिवृत्त तहसीलदार यांच्यावर गाज पडली असुन त्यांना प्रशासकीय कारवाईला समोर जावे लागले आहे.

**व्हिडिओ व्हायरल; दुहेरी दरांचा खेळ उघड?**

या प्रकरणाचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठया प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली असुन सर्व पितळ उघडे पडले आहे. संबंधित घाटावर कार्यरत असलेल्या एका युवकाने कॅमेऱ्यासमोर कबुली देताना, ‘एकच रॉयल्टी स्लिपवर अनेक वेळा रेती वाहतूक केली जाते,’ असा दावा केल्याचे सांगितले जाते. या कबुलीजबाबामुळे घाटावरील व्यवहारांवर संशयाची छाया दाटली आहे.जर या कबुली जबाबात सत्यता असल्यास हा प्रकार प्रशासनाच्या मुकसंमतीने तर चालत नाही? असा प्रश्न येथे उपस्थित होत आहे.

**शासनाचे अधिकृत दर ५०००, मात्र ‘डबल चार्ज’ २५००?**

माहितीनुसार, एका टिप्परच्या रेतीसाठी अधिकृत रॉयल्टी दर सुमारे ५,००० रुपये आहे. मात्र प्रत्यक्षात काही ठिकाणी वैध पावती न देता किंवा तथाकथित ‘डबल चार्ज’ च्या नावाखाली २,५०० रुपयांत रेती भरली जात असल्याचा आरोप केला जात आहे. काही प्रकरणांत एकदाच रॉयल्टी भरून त्याच पावतीवर दिवसभर अनेक वेळा टिप्पर पाठवले जात असल्याची बाबही समोर आली आहे.

**खनिज नियमांना हरताळ?**

खनिज नियमांनुसार प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्र रॉयल्टी पावती आवश्यक असते. तसेच वाहनाची नोंद, वेळ आणि वजन याची अचूक नोंद ठेवणे बंधनकारक आहे. मात्र पवनीतील संबंधित घाटावर एकाच पावतीचा पुर्नवापर, ओव्हरलोड वाहतूक आणि अपूर्ण कागदपत्रांवर रेतीची ने-आण होत असल्याचा आरोप केला जात आहे. हे सर्व प्रकार सिद्ध झाल्यास ते गंभीर आर्थिक गैरव्यवहार ठरू शकतात. दरम्यान, या प्रकरणी अधिकृत पातळीवरून अद्याप स्पष्ट प्रतिक्रिया आलेली नसली तरी लवकरच संबंधित विभागाकडून चौकशी सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पवनीतील या कथित रेती रॉयल्टी घोटाळ्यामुळे जिल्ह्यातील इतर घाटांवरील व्यवहारांवरही प्रशासनाने लक्ष ठेवण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

### ‘त्या’ रेती घाटाचा ‘बादशाह’ कोण?

पवनी तालुक्यातील ‘त्या’ रेती घाटावर रॉयल्टी वसुलीत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू असल्याचे ‘त्या’ व्हायरल झालेल्या व्हिडीओतुन लक्षात येते. लिलाव प्रक्रियेत शासनाने सर्व अटी व शर्ती ठरवुन दिलेल्या असतांना त्या सर्व अटी-शर्ती बाजुला सारून स्वतःची एक नियमावली तयार करून त्या आधारे हा रेतीघाट चालविला जात असल्याचे चित्र दिसुन येत आहे.शासनाने प्रति रॉयल्टी ब्रास दर निश्चित केले असतांना त्यामध्ये मनमर्जीने मोठे फेरबदल करून एकप्रकारे रेती चोरी ला चालना देण्याचा प्रकार त्या रेतीघाटावर सुरू असल्याचे त्या व्हायरल व्हिडीओतुन दिसुन येते. या प्रकारातुन शासनाच्या महसुलाला दररोज लाखोंचा आणि वर्षाला कोट्यवधी रुपयांचा फटका बसत असतांना संबंधीत विभागाची या प्रकाराकडे डोळेझाक का? व त्या रेतीघाटाचा ‘बादशाहा’ कोण? असे एक ना अनेक प्रश्न नागरीकांच्या मनात संशयाचा कल्लोळ माजवित आहेत.

### प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

या संपूर्ण प्रकरणामुळे जिल्हा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घाटावरील सीसीटीव्ही फुटेज, रॉयल्टी रजिस्टर आणि महसूल अभिलेखांची तपासणी केल्यास सत्य बाहेर येऊ शकते, असे मत जाणकार व्यक्त करत आहेत.मात्र संबंधीत विभागाचे अधिकारी या बाबींकडे दुर्लक्ष करीत असल्याने त्यांचा या सर्व प्रकाराला छुपा पाठींबा तर नाही? अशी शंका आता व्यक्त केली जात आहे.

### नागरिकांची चौकशीची मागणी

पवनी तालुक्यातील ‘त्या’ रेती घाटावरून अवैधरित्या रेतीचे उत्खनन व वाहतुक सुरू असल्याचा आरोप नागरीक करीत आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. शासनाने तात्काळ लक्ष घालून महसुली नुकसान थांबवावे, अन्यथा अशा प्रकारांमुळे सरकारी तिजोरीवर मोठा बोजा पडू शकतो, अशी भावना व्यक्त होत आहे.

## सरकारच्या कामगारविरोधी धोरणांच्या निषेधार्थ
## भंडाऱ्यात विविध संघटनांचा संयुक्त मोर्चा




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** सरकारच्या कामगार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ दि.१२ फेब्रु. रोजी अखिल भारतीय आयटक संघटना, भारतीय कॉम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र अंश-कालीन कर्मचारी संघटना, फळबाग रोपवाटीका मजूर संघटना, आशा वर्कर, मोलकरीण संघटना आणि जिल्हा व तालुका इंटक संघटना यांचा संयुक्त मोर्चा त्रिमूर्ती चौक भंडारा येथे काढण्यात आला.

भारतीय जनता पक्षाच्या शासन काळात पूर्वी च्या सरकारने मजुरांना कामाच्या अनुषंगाने योग्य वेतन तसेच कामगारांच्या सोयी सुविधा तसेच रोजगाराचे संरक्षण देण्याकरिता ४२ कायदे तयार केले होते. हे सर्व कायदे बासनात गुंडाळून त्यांचे संरक्षण काढून टाकले एवढेच नाही तर किमान वेतन सुद्धा मिळणे दुरापास्त केले. ३०० पेक्षा कमी कामगार असलेल्या उद्योगांमध्ये कामगार संघटना बनवू शकणार नाही अशी व्यवस्था निर्माण करण्यात आली. सरकारने समाजवाद, साम्यवाद ह्या विचारांना चिरडून भांडवलशाही विचारसरणी अंगीकारली आहे. अमेरिकेच्या भांडवलशाही धोरणाचे मांडीलिकत्व घेतले असून श्रीमंत अतिश्रीमंत तर गरिबांना अतिगरीब करण्याचा विडा उचलला आहे. ह्याचा आम्ही कडक निषेध नोंदवीत आहोत. जोपर्यंत भाजप प्रणित सरकार आहे तोपर्यंत हा अन्याय संपणार नाही. या करिता सरकार बदलने गरजेचे आहे. यानंतर हा लढा देशभर सुरु ठेवण्याचा निश्चय यावेळी करण्यात आला.

ह्या प्रसंगी विविध संघटनाचे प्रतिनिधी सर्वश्री हिवराज उके, इंटक चे अध्यक्ष धनराज साठवणे यांनी यावेळी सभेला मार्गदर्शन केले. या प्रसंगी इंटक चे जिल्हा इंटक तथा शहर कॉंग्रेस चे कार्यकर्ते नथ खंडाईत, नरेश जीभकाटे, अमरदीप नागपुरे, स्नेहा भोवते , नरेशचंद्र कावळे व मोठया संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते व कामगार वर्ग उपस्थित होता.

## परवानगीशिवाय मूर्ती स्थापन; गुन्हा दाखल

**भंडारा :** कारधा पोलीस ठाण्याच्या घेता हद्दीतील माटोरा गावात कोणतीही शासकीय परवानगी न अनधिकृतरित्या छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती स्थापित केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध कारधा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या नियमानुसार कोणत्याही राष्ट्रपुरुष अथवा महापुरुषाची मूर्ती सार्वजनिक ठिकाणी उभारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, या नियमांकडे दुर्लक्ष करत माटोरा येथील नेहरू वॉर्डमध्ये ७ ते ८ फेब्रुवारीदरम्यान अज्ञात व्यक्तींनी कोणतीही कायदेशीर प्रकिया न करता मूर्तीची स्थापना केल्याचे समोर आले.

# विना क्रमांकाच्या वाहनातून रेतीची वाहतूक
## प्रशासनाचे दुर्लक्ष की छुपा पाठिंबा?

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** भंडारा जिल्ह्यात सध्या रेती वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून विना क्रमांकाच्या वाहनातून सर्रास रेतीची वाहतूक होत असल्याचे चित्र समोर येत आहे. जिल्ह्यात अधिकृतपणे एकही रेती घाट सुरू नसल्याची स्थिती असताना मोठ्या प्रमाणात रेती भरलेले ट्रक व तिप्पट वाहने नागपूरच्या दिशेने जाताना दिसत आहेत. विशेष म्हणजे या वाहनांवरील नंबर प्लेट कोऱ्या, झाकलेल्या किंवा मुद्दाम पुसलेल्या अवस्थेत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक विभागाचे कर्मचारी तैनात असतानाही ही वाहने दिवसाढवळ्या शहरातून जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र अशा वाहनांना अडवले जात नसल्याने वाहतूक व आरटीओ विभागाच्या भूमिकेबाबत संशय निर्माण झाला आहे. नियमांचे काटेकोर पालन सामान्य नागरिकांकडून अपेक्षित असताना रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांना मात्र मोकळीक का दिली जाते, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दुचाकी किंवा चारचाकी वाहनांची नंबर प्लेट थोडीशी अस्पष्ट असली तरी तत्काळ दंडात्मक कारवाई करणारे अधिकारी, विना क्रमांकाच्या जड वाहनांकडे मात्र दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसते. त्यामुळे प्रशासनाचा दुटप्पीपणा उघड होत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे.



या प्रकारामुळे अपघाताचा धोका देखील वाढला आहे. विना क्रमांकाच्या वाहनामुळे अपघात घडल्यास संबंधित वाहनाची ओळख पटवणे कठीण ठरते. अशा परिस्थितीत अपघातग्रस्तांना न्याय मिळवणे अवघड होऊ शकते. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.स्थानिकांच्या मते, जिल्ह्यात रेती घाट सुरू नसताना इतक्या मोठ्या प्रमाणात रेतीची वाहतूक कशी सुरू आहे, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. वाहतूक विभाग, आरटीओ, महसूल व पोलिस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून विना क्रमांकाच्या वाहनांवर तातडीने कारवाई करावी, तसेच या वाहतुकीमागील साखळी उघड करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास भविष्यात मोठा अपघात किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### सावरी/ मुरमाडी येथे हत्तीरोग नियंत्रण गोळ्यांचे वाटप

**लाखनी :** सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय सावरी/ मुरमाडी येथे ग्रामीण रुग्णालय लाखनीचे वतीने हत्तीरोग निर्मूलन नियंत्रण विभागातर्फे प्राचार्या कु.स्वाती वासनिक यांचे मार्गदर्शनाखाली येथील विद्यार्थी व विद्यार्थीनींना हत्तीरोग नियंत्रण गोळ्यांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी आशा सेविका जयश्री चोले, आशा धांडे यांचे चमूने हतीरोग नियंत्रण गोळ्यांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. या साठी विद्यालयातील वंदना आगाशे, मनिषा सुखदेवे, स्मिता आगाशे, सुरेखा गभणे, कविता साठवणे, मनोज खोब्रागडे, विजय रिनाईत, लोगडे यांनी सहकार्य केले.

## आमदार डॉ. परिणय फुके यांचे इंग्लंडमधील वेल्स विद्यापीठात मार्गदर्शन



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** इंग्लंडमधील वेल्स विद्यापीठाने १६ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत आयोजित चर्चासत्रासाठी आमदार डॉ. परिणय फुके यांना आमंत्रित केले आहे. वेल्स विद्यापीठाच्या लॅम्पिटर कॅम्पसमध्ये हा कार्यक्रम पार पडणार आहे.

इंग्लंडमधील वेल्स विद्यापीठातर्फे महाराष्ट्र विधीमंडळाच्या निवडक सदस्यांकरिता '' सुशासन व सार्वजनिक धोरण'' या विषयावर १६ फेब्रुवारी ते शुक्रवार २० फेब्रुवारी कालावधीत चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. यासाठी आमदार डॉ. परिणय फुके यांची निवड करण्यात आली आहे.

वेल्स विद्यापीठाच्या लॅम्पिटर कॅम्पसमध्ये आयोजित या चर्चासत्रासाठी आमदार डॉ. फुके हे १५ फेब्रुवारीपर्यंत लंडन येथे उपस्थित राहणार आहेत. डॉ. परिणय फुके वरिष्ठ सभागृह असलेल्या विधानपरिषदेत निवडून आले आहेत. राज्यमंत्री म्हणून सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास आणि वने या विभागांची जबाबदारी सांभाळली आहे. एमबीए आणि पीएचडी असलेल्या आमदार डॉ. फुके यांनी महापालिकेतून नगरसेवक म्हणून कारकीर्द सुरु केली होती. त्यानंतर विधानपरिषद सदस्य, राज्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यामुळे "सुशासन व सार्वजनिक धोरण" यावर त्यांचे भाषण इंग्लंडच्या वेल्स विद्यापीठासाठी एक महत्वाचा दस्तऐवज ठरणार आहे.

## आजपासून गायमुख यात्रेला सुरुवात,प्रशासनाची तयारी पुर्ण

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**तुमसर:** तालुक्यातील गायमुख देवस्थान महाशिवरात्री निमित्त दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील आठ दिवसाच्या यात्रेला सुरुवात झाली आहे. या ठिकाणी मध्यप्रदेश छत्तीसगढ राज्यातील आणि विदर्भातील भक्तगण देव दर्शनासाठी मोठया संख्येने येत असतात.

या ठिकाणी सातपुडा पर्वताच्या शिखरावर पार्वती चे हिवर बावाजीची मळी आणि पर्वताच्या पायथ्याशी शिवलिंग आणि शिवजीची मंदिर आहे या ठिकाणी लाखोंच्या संख्येने भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात भाविकांची यात्रेत गैरसोय होऊ नये या साठी २८० पोलीस कर्मचारी अधिकारी पदाधिकारी वेगवेगळ्या ठिकाणी तैनात करण्यात आले आहे. जेणेकरून कोणताही अनुचित प्रकारची घटना घडणार नाही. मंदिरामध्ये बॅरीगेट लावून भक्तांना नियोजनबध्द दर्शन घेता येणार असल्याचे आंधळगाव पो.स्टे. पोलीस निरीक्षक नितीन राठोड यांनी सांगितले. यात्रेमध्ये आरोग्य विभागातर्फे तिन रूग्णवाहिका उपलब्ध असणार असुन सहा मोबाईल टॉयलेट ची व्यवस्था करण्यात आली आहे. सोबतच भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. यात्रेमध्ये येणाऱ्या नागरीकां कोणत्याच प्रकारचा त्रास होणार नाही याकरीता दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे . गर्दी होऊ नये याकरिता यावर्षी मंदिराचे मुख्य प्रवेशद्वारापासुन मंदिर परिसर पर्यतचा रस्त्याचे रूंदीकरण करण्यात आले आहे. गायमुख्य यात्रेत येणाऱ्या भाविक भक्तांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याकरीता प्रशासनाने पुर्ण तयारी केली असुन प्रशासन सज्ज असल्याचे तहसीलदार तुमसर उपेश अंबादे यांनी सांगीतले.

### रंगवानी यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती

**तुमसर :** पूज्य सिंधी पंचायत तुमसरचे अध्यक्ष गुलराजमल कुंदवानी यांनी पूज्य सिंधी पंचायत तुमसरच्या कार्यकारी समितीची घोषणा केली आणि सिंधी समुदायाचे तरुण नेते योगेश रंगवानी यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती केली. सिंधी समुदायाच्या सदस्यांनी या नियुक्तीसाठी शुभेच्छा दिल्या.



## रा.तु.म.विद्यापीठ युवारंग २०२६ स्पर्धेत विदर्भ महाविद्यालय लोकनृत्य प्रकारात द्वितीय

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**लाखनी :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठा मार्फत दरवर्षी युवकांना सांस्कृतिक क्षेत्रात संधी मिळावी म्हणून युवारंग स्पर्धा मागील २८ वर्षापासून आयोजित करण्यात येत आहे. युवा रंग स्पर्धा अंतर्गत वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करण्यात येतात व त्यात विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांच्या चमू सहभागी होऊन आपल्या कला सादर करतात यामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरते सोबतच या स्पर्धेत प्राविण्य मिळविण्याकरिता सर्वच महाविद्यालये प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतात. युवा रंग स्पर्धेत यश मिळविणे ही महाविद्यालयासाठी प्रतिष्ठेची बाब ठरते. यावर्षी १२९ महाविद्यालये युवा रंग स्पर्धेत सहभागी झाली होती.स्थानिक विदर्भ महाविद्यालय लाखनी येथील कु.आरती खेडीकर, कु. विभा शिंगणजुडे, कु.प्रेरणा मांढरे,कु.संजना मडावी,कु.सालिना मडावी, कु. ऋषिता वाढीवा, कु.काजल पुराम, कु.करीना बुराडे या विद्यार्थ्यांनीनी लोकनृत्य कला प्रकारात सहभाग नोंदविला होता विद्यार्थ्यांनी गोंडी नृत्य सादर करून सर्व उपस्थितांची प्रशंसा मिळविली. व या स्पर्धेत अप्रतिम लोकनृत्य सादर केल्याने त्यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला विद्यार्थ्यांच्या या यशाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नाजूक बनकर यांचे मार्गदर्शन लाभले सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. नीलिमा कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी "गोंडी नृत्य" सादर केले होते. या विद्यार्थ्यांनी गोंडी नृत्य सादर करून विद्यापीठ स्तरावर आपली प्रतिभा सिद्ध करून प्राविण्य प्राप्त केले या यशाबद्दल प्राचार्य डॉ . नाजूक बनकर, डॉ.अमित गायधनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्मिळ ‘होन’ भंडाऱ्याच्या सार्वजनिक वाचनालयात

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** जिल्ह्यातील सर्वात जुन्या व वाचन संस्कृतीची वैभवशाली परंपरा जपणाऱ्या गांधी चौक भंडारा येथील सार्वजनिक वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्मिळ सोन्याचे ‘होन’ हे नाणे संग्रही सापडले आहे.

सार्वजनिक वाचनालय भंडारा येथील तिजोरीत सापडलेल्या ‘होन’या नाण्याच्या एका बाजूवर ‘श्री राजा शिव’ अशी अक्षरे नमूद असून दुसऱ्या बाजूवर ‘छत्रपति’ असा मजकूर आहे. काही मजकूर एका कागदावर छापलेला आहे. यात लिहिलेले आहे की, ‘शिवाजी महाराजांचे फक्त सहा होन आतापर्यंत उपलब्ध झाले असून हे नाणे फार दुर्मिळ आहे. एक होन राष्ट्रीय संग्रहालय नवी दिल्ली येथे असून एक मुंबईत प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे?.’ ‘होन’ हे दुर्मिळ नाणे असलेल्या बाजूला हाच मजकूर इंग्रजीत छापलेला आहे. त्या खाली हे ‘होन’ सोन्याचे असल्याचे नमूद केलेले आहे. या नाण्याचे वजन २.८४९० ग्रॅम्स, व्यास १.२ सेंटीमीटर असे इंग्रजी व मराठीत छापलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाच्या वेळी १६७४ ला महाराजांनी चलनात आणलेल्या व भंडाऱ्यातील सार्वजनिक वाचनालयात



(सार्वजनिक वाचनालय भंडारा येथे असलेले हे ते 'होन' )

असलेल्या या छत्रपती शिवरायांच्या ‘होन’ बद्दलची माहिती देतांना सार्वजनिक वाचनालय भंडाराचे अध्यक्ष धनंजय दलाल यांनी सांगितले की ‘१६४ वर्षाची वाचन परंपरा असलेले हे वाचनालय सुरुवातीला दुसऱ्या इमारतीत होते. माजी आमदार व या वाचनालयाच्या नवीन वास्तुचे शिल्पकार भाऊसाहेब दलाल यांनी नवीन इमारतीत खूप वर्षापासून या वाचनालयाचा भाग असलेली जुनी तिजोरी लावली. मात्र ही तिजोरी उघडण्यात आली नव्हती कारण या जुन्या तिजोरीच्या किल्ल्या नव्हत्या शेवटी उत्सुकतेपोटी या तिजोरीची किल्ली तयार करून ही तिजोरी काही महिन्यापूर्वी उघडण्यात आली. तेव्हा या तिजोरीच्या आत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी महाराजांनी चलनात आणलेले ऐतिहासिक व दुर्मिळ ‘होन’ आढळले. छत्रपती शिवरायांचा हा अमूल्य दुर्मिळ ठेवा वाचनालयाच्या तिजोरीत कसा आला याचा अद्याप इतिहास समजलेला नाही. पुरातत्व विभागाने या विषयीचा अधिक खुलासा करावा अशी विनंती सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल यांनी केली आहे. हे शिवकालीन दुर्मिळ ‘होन’ शिवप्रेमींना पाहण्यासाठी सार्वजनिक वाचनालय भंडारा येथे ठेवण्यात आले आहे असेही त्यांनी सांगितले.

## बँकेतील चोरी प्रकरणात दोन जण पोलिसांच्या ताब्यात

### काही रक्कम जप्त केल्याची माहिती

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १४**

वर्धा-आर्वी मार्गावर सुकळी (बाई) येथे रस्त्याच्या कडेला असलेल्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत अज्ञात चोरटयांनी चोरी केली होती, चोरटयांनी बँकेच्या खिडकीच्या सळाखी कापून आत प्रवेश केल्याचे उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ निर्माण झाली होती, या प्रकरणात दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेत काही रक्कम जप्त केल्याची सुत्रांची माहिती आहे,

सुकळी (बाई) येथील बँकेतून चोरटयांनी २३ लाख रुपयावर रोकड चोरुन नेली होती, कर्मचारी बँकेत पोहोचल्यावर चोरीची घटना पुढे आली होती, पोलिसांनी तक्रारीवरुन गुन्हा दाखल करत शोध सुरू केला, पोलिसांनी तपासादरम्यान दोन जणांना ताब्यात घेतले, पोलिसांनी आरोपींकडून काही रोकड जप्त केल्याचे समजते, पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सावंगी (मेघे) पोलिस ठाण्याचे ठाणेदार पंकज वाघोडे करीत आहेत.

# उपवासाचे पदार्थ सेवन करतांना काळजी घ्यावी

## अन्न व औषध प्रशासन विभागाचे आवाहन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १४**

दि.१५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्र असल्यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक उपवास करतात. उपवासाला मोठ्या प्रमाणात भगर, शिंगाडा व राजगीरा पीठ इत्यादी पदार्थांचे सेवन केले जाते. सदर पदार्थांचे सेवन केल्याने अन्न विषबाधा यासारख्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उपवासाचे पदार्थ सेवन करतांना खबरदारी घ्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

**उपवासाचे पदार्थ सेवन करतांना काय काळजी घ्यावी**



बाजारातून उपवासाचे अन्नपदार्थ आणल्यानंतर ते निवडून स्वच्छ करा. शक्यतोवर पॉकीटबंद पदार्थ घ्या. ते घेतांना पॉकीटावरचा पॅकींग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासून घ्या. अन्न पदार्थ साठवतांना ते स्वच्छ, कोरड्या ठिकाणी, व्यवस्थीत झाकणबंद डब्यात ठेवा, जेणेकरुन वातावरणातील ओलाव्यामुळे बुरीशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस अन्नपदार्थ साठवू नका. जास्त दिवस साठविलेले अन्नपदार्थ खाऊ नका. शक्यतोवर उपवासाचे उघड्यावरचे अन्नपदार्थ विकत आणू नका. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी. भगर आणि शेंगदाणे हे अधिक प्रथिनयुक्त आहेत. दोन तीन दिवस सलग उपवास असतांना या पदार्थाचे सेवन ॲसिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थाचे सेवन पचनशक्ती नुसार मर्यादितच करावे. शिळ्या अन्नपदार्थाचे सेवन करु नये.

### उपवासाचे अन्नपदार्थ विक्रेत्यांसाठी सूचना

विक्रेत्यांनी पॅकबंद अन्नपदार्थांचीच विक्री करावी. अन्नपदार्थ खरेदी करतांना उत्पादक, घाऊक विक्रेत्यांकडून पावती, बिले घ्यावे. अन्नपदार्थाचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता, परवाना क्रमांक, पॅकींग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करून घ्यावी. मुदतबाह्य अन्नपदार्थांची विक्री करु नये. तयार अन्नपदार्थ उघड्यावर ठेऊ नये व ते तयार करतांना स्वच्छता व आरोग्यविषयक बाबींची दक्षता घ्यावी. कोणत्याही प्रकारची अप्रिय घटना घडल्याचे निर्दशनास आल्यास अन्न व औषध प्रशासन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त (अन्न) प्र.भ.टोपले यांनी कळविले आहे.

### आष्टी येथे मालवाहू वाहनांच्या अपघातात दोघे जखमी

**वर्धा :** मालवाहू वाहनांच्या अपघातात दोन जण जखमी झालेत, हा अपघात आष्टी येथे ११ फेब्रुवारी रोजी घडला,

अमरावती जिल्हयाच्या गाळेगाव येथील दिलीप सावतकर हे एम. एच. २३, ५४४५ या क्रमांकाच्या वाहनातून जोलवाडी येथून कापूस घेऊन आष्टी येथे जात होते, वाहनात भूषण पांडे, अविनाश गोधडे, अमोल भोरे, रा. साहूर हे बसून होते, दरम्यान, आष्टी येथील होले नर्सरी समीप मोर्शीकडे एम. एच. ०४. जी. सी. ६०३१ क्रमांकाच्या वाहनाला जोरदार धडक दिली, यात भूषण पांडे आणि अविनाश गोधडे या दोघांना दुखापत झाली, अपघात दोन्ही याप्रकरणी तक्रारीवरुन आष्टी पोलिसांनी फिरोज खा सत्तार खाँ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला, पोलिसांचा पुढील तपास सुरु आहे.

# फराज अहमद व अरमन शेख यांची इस्रो भेटीकरीता निवड



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १४**

नुकत्याच पार पडलेल्या विज्ञान प्रदर्शनीमध्ये अग्रगामी पिपरी येथील विद्यार्थी फराज खान व अरहम शेख यांनी जिल्ह्यातील उत्कृष्ट विज्ञान मॉडेल सादर केले असून जिल्हा स्तरावर निवड त्यांची मॉडेलची निवड करण्यात आली आहे.त्यांनी पायजो इलेक्ट्रॉनिक जनरेटर हे दाबावातून निर्माण होणारी विद्युत उपकरण तयार केले असुन स्वस्त व प्रदूषण विरहीत विद्युत निर्मिती साधन आहे. या अनुषंगाने अग्रगामी पिपरी येथील विद्यार्थी फराज अहमद याची इस्रो अभ्यास मंडळामध्ये निवड करण्यात आली आहे.

या अभ्यास भेटी अंतर्गत भारतीय अंतराळ संशोधन संस्थे मधील उपग्रह संशोधन, हवामान अंदाज, भुवलोकन व अंतराळ तंत्रज्ञान विकसित करणे या क्षेत्रात होत असलेल्या वैज्ञानिक प्रयोगांना घेऊन प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी दिली जाणार असून तेथील वैज्ञानिकांसोबत संशोधनात त्यांना सहभाग व अनुभव घेता येणार आहे.हे अभ्यास मंडळ सहल १५ ते १९ फेब्रुवारी पर्यंत आयोजीत आहे. फराज अहमद व अरहम शेख या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मॉडलची निवड राज्य शिक्षण मंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. राम सिनोरे, डॉ. उर्मिला हाडके, डॉ. सीमा पूसतकर व मस्के यांनी केली आहे. विद्यार्थ्यांचे मुख्यध्यपिका सिस्टर रोझा यांनी कौतुक केले आहे.

## निधन वार्ता

### मालती कोहळे



आष्टी (शहीद): देलवाडी येथील रहिवासी मालती यादवराव कोहळे (वय ८२)यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात मुलगा, तीन मुली, जावई, स्नुषा, नातवंड असा परिवार आहे.त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त यादवराव कोहळे यांच्या पत्नी होत.

### उमेश उईके



**वर्धा** - येथील शहर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले गजानन नगर येथील रहिवासी पोलीस अंमलदार उमेश मारोतराव उईके (वय ४५)यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी रुपाली उमेश उईके (वय ३५), दोन मुली, आई असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सहकारी व मित्रपरिवाराकडून शोक व्यक्त करण्यात येत आहेत.

# बोधगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला खासदार काळेंचा पाठिंबा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १४**

तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदपथावर दिल्ली येथे चाललेल्या बोधगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. या धरणे आंदोलनामध्ये खासदार अमर काळे यांनी सहभागी होत या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे.

या जागतिक वारसा स्थळाला जगात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या प्रार्थनास्थळाच्या प्रशासनावर पूर्ण मालकी हक्क मिळविण्यासाठी बौद्ध भिक्खू आणि अनुयायांनी १२ फेब्रुवारी २०२५ पासून आंदोलन सुरू केले आहे. बोधगया मंदिर कायदा १९४९ रद्द करण्याची आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. यासह सर्व न्यायोचित मागण्यांना खा. अमर काळे यांनी समर्थन दिले.सोबतच धरणे आंदोलनात सहभाग घेतला व वर्धा लोकसभा मतदार संघाचे लोकप्रतिनीधी म्हणून पाठींबा दर्शविला. यावेळी डॉ. प्रशांत पडोळे खासदार भंडारा तसेच बुद्धगया महाबोधी महविहार मुक्ती आंदोलनाशी संबंधित विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

## एसटीच्या सवलतधारक प्रवाशांना मिळणार एनसीएमसी स्मार्टकार्ड

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १४**

रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन, पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्यासाठी एसटी महामंडळाने नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड (एनसीएमसी) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सवलतधारक प्रवाशांचा स्मार्टच्या माध्यमातून प्रवास सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे. या सेवेचा प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

एसटीच्या विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार आहे. ही केवळ तांत्रिक सुधारणा नसुन प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल आहे. सवलतीच्या अचूक नोंदी, पारदर्शक प्रतिपुर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार्डमध्ये सामावल्या जाणार आहे. शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सरल क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल. अमृत जेष्ठ नागरिक, सर्वसाधारण जेष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळेल, दिव्यांग प्रवाशांना युडीआयडी क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड देण्यात येणार आहे. तसेच स्वातंत्र्य सैनिक, अधिस्विकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालय येथील मुख्यालय आगारामार्फत कार्डचे वितरण करण्यात येणार आहे.सदर कार्ड स्मार्ट असल्यामुळे इटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाईल ॲप किंवा नियुक्त एजंटकडून सहज रिचार्ज होईल. कार्डची किमंत १९९ रुपये जीएसटीसह असून जुने कार्ड जमा केल्यास १४९ रुपयात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.कार्ड नोंदणी करीता राज्य परिवहन महामंडळामार्फत व्यापक यंत्रणा उभारण्यात येणार असून जेष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी ३ हजाराहून अधिक एजंट नियुक्त करण्यात आले आहेत. बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. प्रवाशांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे विभाग नियंत्रक भगवान जगनोर यांनी कळविले आहे.

# शंकरपटामध्ये बैतुलची बैलजोडी ठरली प्रथम क्रमांकाची मानकरी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**कारंजा(घा.), दि.१४**

जंगी शंकरपट व कृषी प्रदर्शनीचे आयोजन दि.८ ते ११ फेब्रुवारी दरम्यान नितीन दर्यापूरकर मित्रपरिवाराच्यावतीने करण्यात आले. शंकरपटामध्ये बैतुलची बैलजोडीने प्रथम क्रमांक पटकावून विजयाची मानकरी ठरली.

या चार दिवसाच्या आयोजनात सुसज्ज नियोजन असलेल्या शंकरपटाचे उद्घाटन आमदार सुमित वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशांत शहागडकर वर्धा जिल्हा संपर्क प्रमुख शिवसेना तसेच दशरथ जाधव, संदीप भिसे नगराध्यक्ष स्वाती भिलकर, भगवान बुवाडे उपाध्यक्ष नगरपंचायत कारंजा व सर्व नगरसेवक,नगरसेविका आदींची प्रमुख उपस्थिती होती.

धावपट्टीवर पहिला जोड महिला धुरकरी अवघ्या १४ वर्षाची मुलगी समृद्धी चंद्रशेखर बेलखडे तिच्याकडून हाकलण्यात आला.

चार दिवस चालणारा शंकरपट हा तीन गटांमध्ये होता अ गट, ब गट व तालुका गट मध्ये घेण्यात आला. जवळपास ११ लाख रुपयांची बक्षिसाची उधळण या तिन्ही गटांमध्ये होती. अ गटात ५० बैल जोड्या, ब गटात ७० बैलजोडी व तालुका गटामध्ये १७० बैल जोडी धावपट्टीवर धावल्या. यावेळी भाजपा जेष्ठ नेते सुधीर दिवे, सहकार नेते संदीप काळे, गणेश इखार जिल्हा संपर्क प्रमुख शिवसेना, संदीप इंगळे आदींनी तसेच तालुक्यातील ज्येष्ठ नेते व मान्यवरांनी भेट दिली.

चार दिवस चालणाऱ्या शंकरपटचे मुख्य आयोजक नितीन दर्यापूरकर यांनी शंकरपट दरवर्षी आयोजित करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन नगरसेवक हेमंत बन्नगरे यांनी केले तर आभार बांधकाम सभापती कमलेश कठाने यांनी मानले.

### अ गटातील विजयी बैलजोड्या

अ गट मध्ये प्रथम क्रमांक रोख रुपये रक्कम एक लाख रुपये निशू अन्विका राठोड बैतुल यांचा कॅप्टन आणि सेवा आठ सेकंद दोन पॉईंट मध्ये या जोडीने पटकावला. द्वितीय क्रमांकयाच जोडी मालकाचा दुसरा जोड लाइटर आणि चिक्या आठ सेकंद वीस पॉईंट मध्ये रोख रक्कम ७१ हजार रुपये यांनी क्रमांक पटकाविला तसेच तृतीय क्रमांक फाल्गुनी पंकज मेटांगळे सावरगाव यांचा भैरव आणि शिवा आठ सेकंद २३ मध्ये पटकाविला.

### ब गटातील विजयी बैलजोड्या

तसेच ब गट मध्ये प्रथम आणि द्वितीय क्रमांक रोख रुपये ६१ हजार आणि ४१ हजार रुपये जीएसके ग्रुप नागपूर यांचा डेविड आणि अर्जुन व एका आणि गोविंदा अनुक्रमे ८.३६ व ८.३४ या जोडीने पटकावला तर तिसरा क्रमांक तास खान जागीर खान पठाण हिवरा याच्या देवा व सर्जा त्यांनी पटकाविला.

तालुका गटात आपल्या तालुक्यातील शेतकरी बांधवांची जोड घेण्यात आले होते. तब्बल १७० जोड या गटात धावले सर्वत्र तालुका गटात खेळलेले शेतकऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे तालुका गटात प्रथम क्रमांक रोख रक्कम ५१ हजार श्री हिमांशू मेश्राम नांदोरा यांचा टिकली आणि शेरा आठ सेकंद ९९ पॉईंट यांनी पटकावला द्वितीय क्रमांक प्रफुल जाधव व जानराव मस्के यांचा सावरिया व भीमा तृतीय क्रमांक शेषराव धामणे उमरी यांचे छावा व शिवा यांनी पटकाविला बक्षीस वितरण सर्व देणगीदार यांच्या हस्ते करण्यात आले.

### बोरगाव (आलोडा ) येथे युवकाची आत्महत्या

**वर्धा :** बोरगाव (आलोडा) येथे युवकाने गळफास घेऊन युवकाने आत्महत्या केली, ही घटना गुरुवारी १२ फेब्रुवारी रोजी घडली, अमन महेंद्र म्हैसकर (वय २२) याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली, त्याच्या आत्महत्येचे कारण कळू शकले नाही, याप्रकरणी तक्रारीवरुन अल्लीपूर पोलिसांनी नोंद केली, पुढील तपास अल्लीपूर पोलिस करीत आहे.

**MAHATMA GANDHI COLLEGE OF NURSING**

At. Dhotra (R), Front of H.P. Petrol Pump, Pulgaon Road, Teh. Dist. Wardha- 442001

Phone No.: 9422144091 Fax No. 07152-252574

E-mail : mgcnwardha@gmail.com Website : www.mgcnwardha.org.in

**WANTED**

Applications are invited in the prescribed format from the eligible candidates for the following posts.

| Sr. No. | Post | Subject | Post Category | Vacancy |
|---|---|---|---|---|
| 1 | Professor cum Principal | Any Subject | OPEN | 01 |
| 2 | Professor cum Vice Principal | Any Subject | OPEN | 01 |
| 3 | Professor | Any Subject | OPEN | 01 |
| 4 | Associate Professor | Paediatric Nursing | OPEN | 01 |
| 5 | Assistant Professor / Lecturer | Medical Surgical/ Foundation of Nursing | OPEN | 01 |
| 6 | Assistant Professor / Lecturer | Paediatric Nursing | OPEN | 01 |
| 7 | Tutor | Nursing | SC | 01 |
| | | | ST | 01 |
| | | | VJNT | 01 |
| | | | OBC | 01 |
| | | | EWS | 01 |
| | | | OPEN | 03 |

Required Qualification, Experience, Other details and prescribed application format are available on the university website : www.muhs.ac.in

**Last Date of Application is 23/02/2026**

# राहुल खेरडेची मदनमस्तीची भाषा कोण थांबवणार ?

## ❖अर्जदारांनीच जागेचे पुरावे सादर करण्याचे सोडले फर्मान ❖गटविकास अधिकारी देशमुखांचे मौनव्रत

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**कारंजा(घा), दि. १४**





तालुक्यातील बोटोना ग्रामपंचायतमधील ग्रामपंचायत अधिकारी राहुल खेरडे यांच्या मस्तवाल आणि उर्मट व्यवहारामुळे बोटोणावासी त्रस्त झाले असून ग्रामपंचायत अधिकारी राहुल खेरडे हा कोणाच्या भरवशावर सामान्य नागरिकांना अरेरावीची भाषा वापरून त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहे? हा सध्या खूप मोठा प्रश्न निर्माण बोटोणा येथील ग्रामस्थांसमोर उभा ठाकला आहे.

सार्वजनिक रस्ता मोकळा करून देण्याच्या अर्जदाराच्या विनंती अर्जावर कोणतीही प्रशासकीय चौकशी न करता भाऊबंदकीच्या खासगी वादाचा देखावा निर्माण करून चक्क सार्वजनिक रस्ता खासगी असल्याचे लेखी बयान व प्रमाणपत्र वरिष्ठ कार्यालयाला सादर केल्याने अर्जदार रामकृष्ण सकर्डे यांचे मानसिक संतुलन ढासळले असून त्यांनी याप्रकरणी फेरचौकशीची मागणी विशेष अधिकाऱ्यांमार्फत करावी अशी विनंती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी तक्रारीतून केली आहे. चुकीचे बयान पाठवून संपूर्ण प्रकरणाला वेगळेच वळण देण्याचा प्रयत्न करणाऱ्या मस्तवाल, मदनक्रीडा करण्यात निपुण असणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी राहुल खेरडेचा खरा चेहरा भूमी अभिलेख कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या कागदपत्राच्या पुराव्यावरून समोर आला आहे.अर्जदार रामकृष्ण सकर्डे यांच्या बोटोणा ग्रामपंचायत हद्दीतील घराच्या समोरील वहिवाटीचा असणारा जुना रस्ता हा गैरअर्जदार वसंता सकडें, रघुनाथ सकर्डे, धनराज सकर्डे यांनी टिन लावून अडविलाअसल्याने सार्वजनिक रस्ता मोकळा करून देण्याची तक्रार संबंधितांकडे केली होती. अर्जदाराने केलेल्या तक्रारीवर कार्यवाही करताना ग्रामपंचायत अधिकारी राहुल खेरडे यांनी आता मात्र अरेरावीची आणि उर्मट भाषेत प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की अर्जदारांनी त्यांच्याकडे असलेले लेखी पुरावे माझ्याकडे सादर करावे.

अर्जदाराकडे असणाऱ्या पुराव्याची शहानिशा करण्यासाठी अर्जदारांनीच पुरावे सादर करावे असा सज्जड दम ग्रामपंचायत अधिकारी राहुल खेरडे यांनी दिला असून ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायत अधिकारी राहुल खेरडे ह्या मस्तवाल आणि कृष्णक्रीडा आणि मदिरासेवन करण्यात परिपूर्ण असलेल्या खेरड्याचे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून मग कोणते काम आहे? असा प्रश्न निर्माण झाला असून मदिराप्राशन आणि कृष्ण लीलेचा आनंद घेणाऱ्या या खेरडे वर आता काय कारवाई होणार कां याकडे बोटोना वासियांचे लक्ष लागून आहे.

### यामुळे निर्माण झाला वाद...

अर्जदार रामकृष्ण सकर्डे यांची भूमी अभिलेख कार्यालयात मालमत्ता पत्रक क्रमांक १९२ ची नोंद असून १९१ धनराज सकर्डे १९० रघुनाथ सकर्डे मालमत्ता पत्रकावर नमूद आहे. सदर मालमत्ता पत्रकानुसार कोणतीही चौकशी न करता ग्रामपंचायत अधिकारी खेरडेने उत्तरेकडे जाणारा रस्ता खासगी असल्याचे प्रमाणपत्र दिले. भूमी अभिलेख कार्यालयात उपलब्ध मालमत्ता पत्रक व नकाशानुसार हा रस्ता सार्वजनिक असल्याचे दिसून येत आहे. त्यामूळे एका मोठ्या नेत्याच्या भ्रमणध्वनीवर राहुल खेरडेने राजकारण करीत हेतूपुरस्सर हा प्रकार केल्याचा आरोप अर्जदार रामकृष्ण सकर्डे यांनी करीत न्याय न मिळाल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला असुन कृष्ण लीलेत रममान होणाऱ्या आणि अर्थिक भ्रष्टाचारात हातखंड असणाऱ्या मस्तवाल खेरडेणे तहसीलदारांच्या आदेशाची सुद्धा अवहेलना करीत वरुड- मोर्शीच्या स्थानिक आमदाराचा मी नातेवाईक असून अशा आदेशाला जुमानत नाही हे सुद्धा मदिरेत तल्लीन झाल्यावर एका ढाब्यावर बोलून दाखवल्याची खमंग चर्चा बोटोणा येथील ग्रामस्थांमध्ये पसरली आहे.

